# ग्लोबल महातेज

१ रु. स्वागत मूल्य

अमळनेर | वर्ष १ ले | अंक : १२ | शनिवार, दि. ४ ऑक्टोबर २०२५ | पाने : ४ | किंमत : १ रु.

https://epaper.globalmahatej.com/ | Email - globalmahatej@gmail.com


**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा–जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा–तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!

## अहो कुणीतरी या मोकाट जनावरांना आवरा हो...!

अमळनेर : शहरात सर्वत्र मोकाट गायी व बैल सर्वत्र मुक्तपणे फिरतात. खासकरून भाजीबाजार परिसरात त्यांची संख्या जास्त आहे. भाजीबाजार घेऊन जाणाऱ्या नागरिकांच्या हातून ते बिनदिक्कतपणे पिशव्या हिसकाऊन घेतात. अचानक उधळतात आणि अनेकांच्या अंगावर जावून धडकतात. त्यांच्यातील झुंजीमुळेही अनेक जण जखमी होतात. वाहनांचे नुकसान होते.

# ‘महातेज’ चा खेडीढोक बाबत जोरदार दणका !

# थेट सीईओंचे वेधले लक्ष : नियोजित उपोषण झाले रद्द...!!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : वृत्तपत्र क्षेत्रात दै. ग्लोबल महातेज नित्यनवीन प्रयोग करीत आहे. लोकांच्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी छायाचित्रांसह थेट व परखड शब्दांत समस्या मांडत आहे. आता दै. ग्लोबल महातेजने याही पुढे जाऊन जनसमस्यांना वाचा फोडण्यासाठी थेट यंत्रणेपर्यंत समस्या पोहोचविणे, त्यांचे लक्ष वेधणे आणि समस्या सुटत नाही तोपर्यंत पाठपुरावा करण्याचे वृत्तपत्र क्षेत्रात नवे तंत्र वापरणे सुरू केले आहे. याचाच सुपरिणाम म्हणून पारोळा तालुक्यातील खेडीढोक येथील जलजीवन मिशन अंतर्गत झालेल्या गैरप्रकारावर थेट वरिष्ठ पातळीवरून दर्जेदार काम करण्याचे आदेश प्राप्त झाले आहेत.

पारोळा तालुक्यातील खेडीढोक येथे जलजीवन मिशन अंतर्गत जलवाहिनीचे काम निकृष्ट दर्जाचे करण्यात आले होते. सदर काम करणारा ठेकेदार व या कामावर देखरेख करणारा सरकारी अधिकारी यांच्यावर कारवाई व्हावी व सदर काम दर्जेदार व्हावे, ही मागणी खेडीढोकचे ग्रामस्थ सातत्याने करत होते. मात्र, त्यांच्या मागणीला यंत्रणा न्याय देत नव्हती. त्यामुळे त्यांनी गांधी जयंती अर्थात २ ऑक्टोबरपासून आमरण उपोषणाचा इशारा प्रशासनाला दिला होता. याबाबत दै. ग्लोबल महातेजने संपूर्ण गैरप्रकाराचा पर्दाफाश करणारी सविस्तर बातमी छायाचित्रांसह प्रसिद्ध केली होती. ग्लोबल महातेज केवळ बातमी प्रसिद्ध करून थांबले नाही, तर अत्यंत कर्तव्यदक्ष व कर्तव्यकठोर असलेल्या जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांच्याकडे पत्राद्वारे व वृत्तपत्राचे कात्रण पुरावा म्हणून देऊन सदर गैरप्रकाराकडे लक्ष वेधले. परिणामी या गैरप्रकाराबाबत वरिष्ठ पातळीवरूनच तातडीने तपास कार्यवाहीचे चक्र फिरले. त्याचा सुपरिणाम असा झाला, की पारोळा येथील पंचायत समितीची यंत्रणा पार हादरली. गैरप्रकारांची मागणी व उपोषणाचा इशारा देणाऱ्या सरपंच उज्ज्वलाबाई गोरख भील आणि उपसरपंच वैशाली गणसिंग पाटील यांची पाणीपुरवठा विभागाचे अभियंता धीरज पाटील यांनी समक्ष भेट घेतली. त्यांना उपोषण स्थगित करण्याची विनंती केली. जलजीवन मिशन योजनेंतर्गत केलेल्या जलवाहिनी कामाची जागा पुन्हा दर्जेदार कामासाठी तयार आहे. हिरापूर शिवारातील शेतातील पाईपलाईन स्थानिक शेतकऱ्यांनी वर उचलून घेतली आहे. ती पुन्हा अंदाजपत्रकानुसार सुधारण्यात येईल. मोहाडी शिवारातील जलवाहिनीवर काँक्रीटचे काम केले जाईल. हल्ली शेतामध्ये पीक उभे आहे. त्यामुळे दुरुस्ती करणे शक्य नाही. पीक कापल्यानंतर तत्काळ दुरुस्ती केली जाईल. अंदाजपत्रकानुसार इतर कामे निधीअभावी अद्याप पूर्ण झालेली नाहीत. मात्र, देयके मिळाल्यानंतर उर्वरीत कामे पूर्ण करण्यासाठी ठेकेदार बांधील राहील, असे आश्वासन ठेकेदारासह श्री. पाटील यांनी आंदोलनाचा इशारा करणाऱ्यांना दिले. त्यांच्या शब्दावर विश्वास ठेवून आंदोलनकर्त्यांनी तूर्तास आंदोलन स्थगित केले आहे. अत्यंत ज्वलंत प्रश्नाला वाचा फोडल्याबद्दल ग्रामस्थांनी दै. ग्लोबल महातेजचे आभार मानले आहेत.



शासनाकडून लोकप्रतिनिधी आणताहेत प्रचंड निधी...!
लोकांच्या पैशातून दर्जेदार कामे होणार तरी कधी ???

पारोळा तालुक्यातील खेडीढोककडे लक्ष देण्यासाठी थेट गांधी जयंतीला...

अनेक ठिकाणी निकृष्ट कामांच्या तक्रारी; ठेकेदार व देखरेख करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : हल्ली जवळपास सर्वच लोकप्रतिनिधी मतदारसंघांमध्ये विकासकामे व्हावीत, यासाठी प्रचंड मेहनत करून संबंधित मंत्री, सचिव व उच्चपदस्थाधिकारी यांचा सातत्याने फॉलोअप घेऊन मोठ्या प्रमाणात निधी आणत आहेत. त्यातून अनेक विकासकामे होत आहेत... झाली आहेत. ही निश्चितच समाधानाची बाब आहे. हे जरी खरे असले, तरी होणारी विकासकामे दिवसेंदिवस अत्यंत निकृष्ट दर्जाची होत आहेत हेही तितकेच वास्तव आहे. शासन देत असलेला निधी हा लोकांनी सरकारला दिलेल्या विविध करांच्या रूपाने जमा झालेल्या पैशातून अर्थात जनतेच्या कष्टाचा आणि घामाचा पैसा असतो. या पैशातून कंत्राटदार मंडळी लोकहिताचा जराही विचार न करता केवळ स्वहितासाठी अनेक नियम व निकषांची पायमल्ली करीत असल्याचे सातत्याने आरोप होत आहेत. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे निकृष्ट व नियमबाह्य काम करणाऱ्या कंत्राटदारांना खुलेआम खडेबोल सुनावत असल्याचे अनेक रिल्स व्हायरल होत आहेत. मात्र एकटे अजितदादा सर्व प्रकारची निकृष्ट कामे थांबविण्यासाठी पुरेसे ठरणे केवळ अशक्य आहे. त्यासाठी प्रत्येक लोकप्रतिनिधी, प्रत्येक उच्चपदस्थ अधिकारी आणि प्रत्येक संबंधित अधिकारी यांनी अजितदादांकडून शिकवण तथा प्रेरणा घेतली पाहिजे. “ आता ‘ वरची ’ मंडळी पूर्वीसारखी अल्पसंतुष्ट राहिली नाही “ “आम्हाला खूप वाटप करावे लागते “ भरमसाठ वाटप केल्याने आम्हालाच परवडत नाही तर दर्जेदार कामे करणार कशी ? “ ठेकेदार मंडळी अशी बिनधास्त उत्तरे देतात. विशेष म्हणजे अशा पद्धतीने ठेकेदारांनी खुलेआम व बेदरकार... दिलेली उत्तरे अनेक प्रकारच्या सो... मीडियात व्हायरल झाली आ... संबंधित शासकीय यंत्रणा या... कामांकडे पाहिजे तसे लक्ष... नाहीत. कधीतरी कटाक्ष टाक... टाकला अन्यथा ‘ सब अल... अशा पद्धतीने सारे काही... आऊटडेटेड ( मेलेले )... दर्जाचे सिमेंट वापरणे, कु... निर्मितीसाठी लोखंड,... सिमेंट यांच्या प्रमाणब...



ग्लोबल महातेज

जा. क्र. ०२/आ./ 2025

प्रति,
मा. श्रीमती मीनलजी करणवाल सो. (I.A.S.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, जळगाव,
जि. जळगाव.

सस्नेह नमस्कार,

विषय : ‘ दैनिक ग्लोबल महातेज ’ मध्ये दि. २५/०९/२०२५ गुरुवार रोजी प्रसिद्ध झालेल्या बातमीची दखल घेऊन आपल्या स्तरावरून केलेल्या कार्यवाहीची माहिती मिळणेबाबत...

महाशय,

उपरोक्त निर्देशित विषयानुषंगाने आपणास विनंती, की आम्ही आमच्या ‘ दैनिक ग्लोबल महातेज ’ मध्ये दि. २५/०९/२०२५ रोजी पान क्रमांक १ वर पुढील दिलेल्या शीर्षकाने शासनाकडून लोकप्रतिनिधी आणताहेत प्रचंड निधी...! लोकांच्या पैशातून दर्जेदार कामे होणार तरी कधी ??? बातमी प्रसिद्ध केली होती. सदर बातमीची दखल घेऊन आपण काय कार्यवाही केली? याबाबतची माहिती पत्राने, व्हॉट्स ॲपद्वारे किंवा ई-मेल वर कळवून आम्हास उपकृत करावे, ही नम्र विनंती.

विशेष निवेदन : सदर पत्रप्रपंचाचा हेतू शुद्ध आहे. त्या पाठीमागे केवळ लोककल्याण, समाजाभिमुखता तथा गैरप्रकार उघडकीस आणणे, लोकांना न्याय मिळवून देणे एवढाच उद्देश आहे. कृपया गैरसमज न करता सहकार्य व मार्गदर्शन करावे, ही विनंती.

आपला सहकार्याभिलाषी,
भरत रघुनाथ पाटील
कार्यकारी संपादक
दैनिक ग्लोबल महातेज अमळनेर, जि. जळगाव

## ग्रामीण भागात किराणा दुकानांवर खुलेआम पेट्रोलची विक्री

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील ग्रामीण भागात अनेक किराणा दुकानांवर पेट्रोलची खुलेआम विक्री सुरू आहे. शासनाचे सर्व नियम धाब्यावर बसवून नागरिकांच्या जीवाशीही खेळण्याचा प्रकार आहे. याबाबत प्रशासनाने कारवाई करण्याची गरज आहे.



वास्तविक पाहाता पेट्रोल व डिझेल हे अत्यंत ज्वालादायी तथा स्फोटकही आहे. त्यामुळेच संभाव्य धोके टाळण्यासाठी त्यांची वाहतूक, विक्री कोणी, कोठे व कशी करावी याबाबत पोलिस व प्रशासनाचे अत्यंत काटेकोर नियम व निकष आहेत.

विशेषत्वाने मोठ्या शहरात सावधानतेचे सर्व नियम जवळपास काटेकोरपणे पाळले जातात. मात्र, छोट्या गावांमध्ये व खेड्यांमध्ये या नियमांची ऐसी– तैसी केली जाते. त्याचे कारण म्हणजे एखादे शहर तथा तालुक्याची कायदा व सुव्यवस्थेची आणि अन्यही महत्वाच्या बाबींची काळजी घेणे त्याबाबतचे नियम पाळणे यासाठी कोठेही पोलिस व प्रशासनाकडे पुरेसे मनुष्यबळ कधीही नसते. अत्यंत तोडक्या मनुष्यबळावर अतिशय महत्वाचे असलेले पोलिस व प्रशासन हे दोन्ही विभाग त्यांना जमेल तशी सेवेच्या विहित वेळेपेक्षा जादा वेळ देऊन, जादा काम करून जबाबदारी निभावण्याचा प्रयत्न करीत असतात. मात्र, या दोन्ही विभागांकडे असलेल्या कमी मनुष्यबळाचा गैरफायदार अनेक अवैध व बेकायदेशीर व्यवसाय करणारे बिनधास्तपणे घेतात. काहींच्या डोक्यावर राजकीय हात असतो. तर काहींचे संबंधित विभागाशी साटे– लोटे असते. गावातील ग्रामस्थांवर त्यांची पकड तथा दहशतही असते. त्यामुळे अशा अवैध व्यावसायिकांना सारे काही फावते.

हल्ली पेट्रोलसारख्या अत्यंत धोकेदायक इंधनाचा ग्रामीण भागामध्ये अवैधरित्या सर्रास काळाबाजार सुरू आहे. खरे तर पेट्रोलपंप चालकांनी कोणालाही बाटली किंवा कॅनमध्ये पेट्रोल किंवा डिझेल देऊ नये असा सक्त नियमच आहे. मात्र, पेट्रोल पंप व्यवसायाची वाढती स्पर्धा व महागडा खर्च यामुळे व्यवसायवृद्धीसाठी ही मंडळी नियमांना बाजुला सारून पेट्रोल व डिझेलची विक्री करतात. दुकानदार पेट्रोल प्लॅस्टिकच्या बाटल्या, कॅनमध्ये विकत आहेत. काही बहाद्दरांनी तर ‘ या ठिकाणी पेट्रोल मिळेल ’ असे फलकच थेट दुकानाबाहेर लावून ठेवले आहेत. पेट्रोलच्या बाटल्या भरून दुकानाच्या काऊंटरवर ठेवल्या असतात. ग्रामीण भागात पेट्रोल पंपापासून दूर अंतर असल्याचा गैरफायदा काही दुकानदार घेतात. दुकानांवर पेट्रोल बाळगणे धोकेदायक आहे. आग, स्फोट किंवा इतर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

शासन वाहतुकीसाठी आणि उद्योगासाठी सुरक्षिततेच्या नियमांची काटेकोर अंमलबजावणी करत आहे. प्रशासन आणि पोलिसांकडून याबाबत कारवाई होणे अपेक्षित आहे. याकडे कोणीही लक्ष देत नाही ही बाब गंभीर आहे. मोठी दूर्घटना घडण्याच्या आत थांबविली जाणे गरजेचे आहे, अशी व्यापक मागणी होत आहे. पेट्रोलची अशी विक्री तातडीने थांबवली गेली पाहिजे. अन्यथा मोठी दुर्घटना घडू शकते.



*अमळनेर : येथील आर. के. नगर परिसरात श्री पेडकाई मातेचे मंदिर आहे. ही देवता अनेकांची कुलदेवताही आहे. दोन वर्षांपासून नवरात्रोत्सवात या मंदिरात सर्व धार्मिक सोपस्कार करण्यात येत आहेत. दोन्ही वेळच्या आरतीला भाविक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.*

## अमळनेर शहरात वाढला कुत्र्यांचा उपद्रव

अमळनेर : शहरातील विविध भागांमध्ये भटक्या कुत्र्यांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत आहे. रात्रीच्या वेळी टोळक्याने फिरणारे हे कुत्रे नागरिकांसह दोरी सोडून निघून आलेल्या बकऱ्यांना चावे घेऊन गंभीर जखमी करीत आहेत. रात्री बाहेर पडणाऱ्या नागरिकांना सतत त्यांच्या हल्ल्याची धास्ती वाटते. शहरातील विविध भागात लहान बालकांना कुत्र्यांनी चावा घेतल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यांच्या भीतीने काही जण वाहनांवरूनही पडले आहेत. नगरपालिकेने यावर तातडीने उपाययोजना करावी, अशी मागणी स्थानिक रहिवाशांकडून होत आहे.

## रेशनच्या तांदुळाची काळ्या बाजारात जादा दराने विक्री

### पुरवठा विभागाने कारवाई करण्याची मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : गरिबांचा समजला जाणारा रेशनच्या तांदुळाचा तालुक्यात मोठ्या प्रमाणात काळाबाजार सुरू आहे. हा तांदूळ स्वस्तात घेऊन जादा दराने व्यापाऱ्यांना विकला जात आहे. या तांदुळात भेसळही केली जात आहे. यामुळे अनेक व्यापारी मालामाल होत आहेत. याकडे पुरवठा विभागाने लक्ष देऊन कारवाईची गरज आहे.



गरजू व गरीबांना अन्न देण्यासाठी राबविण्यात येत असलेली गरीब कल्याण अन्न योजना काळाबाजार करणाऱ्यांसाठी वरदान ठरत आहे. योजनेतील तांदूळ तस्करांच्या हाती उघडपणे दिसत आहे. तालुक्यातील अनेक गावांमध्ये हा तांदूळ बेकायदेशीरपणे जमा करून मोठ्या व्यावसायिकांना विकला जात आहे. त्यामुळे गरीबांसाठी असलेला तांदूळ धनदांडग्यांच्या खिशात पैसा ओतत आहे. तालुक्यात दारिद्र्यरेषेखालील (बीपीएल) कुटुंबांना तांदूळ वाटप केले जाते. कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला दरमहा पाच किलो तांदूळ दिला जातो. मात्र, या तांदळाचा काळ्या बाजारात मोठ्या प्रमाणावर व्यापार सुरू आहे. काही नागरिक रेशनचा तांदूळ स्वतः न वापरता थेट विक्री करत आहेत. जमा केलेला तांदूळ शहरातील ठिकठिकाणी गोदामांमध्ये बेकायदेशीरपणे साठवला जातो. हा तांदूळ मोठे व्यापारी खरेदी करतात. महाराष्ट्रासह इतर राज्यात पुरवत असल्याचे समोर येत आहे.

**रोज मोठ्या प्रमाणावर होते तांदळाची खुलेआम खरेदी**

रेशनचा तांदूळ संकलनासाठी व्यापारी ऑटोरिक्षा व मालवाहू वाहने घेऊन गावोगाव फिरतात. तांदळाची खरेदी १५ ते २० रुपये किलो दराने केली जाते. काहींना तांदळाच्या बदल्यात किराणा माल दिला जातो. अशा प्रकारे दररोज टनभर तांदूळ जमा होतो. खरेदी केल्यानंतर लगेच पैसे दिले जातात. परिणामी तांदळाचा काळाबाजार जोमात सुरू आहे. प्रशासनाने यावर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

कमी दराने विकत घेतलेला तांदूळ काही ठिकाणी पॉलिश केला जातो. त्यानंतर तो उच्च प्रतीच्या तांदळात मिसळला जातो. व्यावसायिक त्याची विक्री इतर जातींच्या तांदळाप्रमाणे जादा दराने करतात. काही तांदूळ व्यापाऱ्यांचा यामध्ये सहभाग असल्याचा संशय व्यक्त होत आहे. पुरवठा विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. काळाबाजार करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे अत्यावश्यक आहे. रेशनचा तांदूळ विक्रीसाठी निघाल्यानंतर लगेचच हॉटेल्सला पुरवला जातो. रेशनच्या तांदळापासून इडली व डोसा चवदार व खुसखुसीत होतो. त्यामुळे काही हॉटेल मालक इडली व डोसा बनवण्यासाठी हा तांदूळ थेट २० ते २५ रुपये किलो दराने खरेदी करतात.

# आमदार अनिलदादा यांनी अपेक्षाभंग, अपमान व रागाचे केले अनोखे सीमोल्लंघन...!

## अब भरोसा टिकानेकी बारी आप सबकी है ‘ भाईसाहब ’...! क्यूकीं मौका बार बार नही मिलता...!!

**ग्लोबल महातेज वत्तसेवा**

अमळनेर : विधानसभा निवडणुकीत मुस्लिम बहुल भागात आमदार अनिल दादा पाटील यांना कमी मते मिळाली. त्यावरून त्यांच्याकडे मुस्लिम बांधवांनी पाठ दाखवली, अशीच जोरदार चर्चा आहे. निवडणुकीत संपूर्ण प्रचार प्रक्रियेतही मुस्लिम समाजाकडून अनिल दादांना फारसा प्रतिसाद मिळाला नाही, हेही अनेक जण खुलेआम सांगतात. खरे तर आमदारकी व मंत्री पदाच्या कार्यकाळात अनिल दादांनी कधीही जात आणि धर्म न पाहता सर्वांसाठी विकास कामे केली आहेत. सर्वांना सर्वतोपरी सहकार्य केले आहे .असे असूनही मतदानात झालेला दुजाभाव अनिल दादांना जिव्हारी लागला होता. मिळालेल्या कमी मतदानातून त्यांचा फक्त अपेक्षाभंगच नव्हे तर अपमानही झाला होता, असे त्यांचे निकटवर्तीय खासगीत बोलतात. मात्र तरीही कोणताही राग न धरता अनिलदादांनी केवळ राजकीय बेरजेला महत्त्व न देता शहरात शांतता अबाधित राहावी यासाठी येईल त्या मुस्लिम बांधवांना खुल्या दिलाने राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पक्षप्रवेश दिला आहे. एक परिपक्व नेता कधीही कोणाबद्दल कायम राग ठेवत नाही. सतत जोडण्याचे काम करतो. त्याचेच जिवंत उदाहरण अनिल दादांनी दाखवून दिले आहे. “ सबका साथ सबका विकास , जो नजदीक आया उसको करो खास “ हेच जणू अनिल दादांच्या या कृतीतून दिसत आहे .अन्यथा काही ठिकाणी ज्या विशिष्ट मतदारांनी ज्या विजयी उमेदवाराला मतदान केले नाही , त्यांना मतदान न केलेल्यांना स्पष्टपणे पक्षप्रवेश नाकारल्याची ही उदाहरणे आहेत. मात्र आपण इतरांपेक्षा वेगळे आहोत. आपले व्यक्तिमत्व आणि वैचारिक पातळी इतरांपेक्षा उंच आणि प्रेरणादायी आहे हेच अनिल दादांनी यातून दाखवून दिले आहे. अर्थात याचा त्यांना आगामी सर्वच निवडणुकांमध्ये निश्चितपणे फायदा मिळाल्याशिवाय राहणार नाही. मात्र दादांनी मोठे मन दाखवून ज्यांना प्रवेश दिला आहे. त्यांच्यावर आता दादांना प्रामाणिकपणे साथ देण्याची व शहरात शांतता ठेवण्याची नैतिक जबाबदारी आहे. एकदा जी होते ते चूक असते. वारंवार जे केले जाते त्याला सवय म्हटले जाते. चूक माफ केली जाते मात्र वाईट सवयी कोणी सहन करत नाही. दादांसारखा खुद्दार माणूस तर अजिबात सहन करणार नाही, याचीही सर्वांनी उचित जाणीव ठेवावी. आगामी काळात शहरात शांतता ठेवण्याची जबाबदारी एकट्या अनिलदादांची नाही. ती सर्वांची आहे. आपला विकास करून घेण्यासाठी आपणही सकारात्मक ,प्रामाणिक आणि एकनिष्ठ राहावे याचीही सर्वांनी या निमित्ताने जाणीव ठेवावी. अनिल दादांनी रागावर आणि नाराजीवर नियंत्रण ठेवून सिमोल्लंघन केले आहे .त्यांना तीर चालविण्याची कलाही चांगली अवगत आहे. मात्र अनिल दादांवर तिरंदाजीची वेळ येऊ देऊ नये ही नव्याने राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केलेल्या सर्वांचीच जबाबदारी आहे. अनिलदादांना वेळोवेळी शांत ठेवण्यात आणि संयम राखण्याबाबत त्यांच्या धर्मपत्नी सौ. जयश्रीताई पाटील यांचा सिंहाचा वाटा असतो. एक खंबीर पत्नी व अष्टपैलू नेतृत्व म्हणून त्या सिद्ध झाल्या आहेत. मात्र जर कोणी गद्दारीच्या ,खोटेपणाच्या आणि स्वार्थाच्या सर्व सीमांचे उल्लंघन करत असेल तर मग अनिल दादांना तिरंदाजी करणे अपरिहार्य ठरेल अशा वेळी सौ जयश्रीताई देखील दादांना रोखू शकणार नाही याची सर्वांनी उचित जाणीव ठेवणे गरजेचे आहे.



*अमळनेर : सिमोल्लघंनाहून आल्यानंतर आमदार अनिलदादा पाटील यांचे औक्षण करताना त्यांच्या धर्मपत्नी सौ. जयश्रीताई पाटील.*
*(छायाचित्र : शरद कुलकर्णी)*



> “ शहराला शांत ठेवण्यासाठी आपण सर्वांनी डोक्यातील राग, कटुत्व ,गैरसमज,, धर्मभेद आणि जातीभेद याचे सीमोलंघन करूया. आपल्या मतदारसंघाला एक आदर्श मतदारसंघ बनवूया .आमदार म्हणून मा. श्री. अनिल दादा मतदारसंघासाठी जे विकासकार्य करीत आहेत त्यांना सर्व मिळून शक्ती देऊयात.
>
> **मुख्तार खाटीक** , शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस




नवरात्र व दसऱ्याच्या पार्श्वभूमीवरील अनेक वाचनीय व संग्रहनीय बातम्या आमच्याकडे आहेत. त्यांना उचित स्थान देण्यासाठी आम्ही आज नेहमीप्रमाणेचे मसाला पान देऊ शकत नाही. उद्यापासून मात्र नियमितपणे आपणास मसाला पानाची चव चाखता येणार आहे.

## सबसे तेज... ग्लोबल महातेज

**अमळनेर : अमळनेरच्या इतिहासात सहा पानी दसरा विशेषांक तोही इम्पोर्टेड ग्लेज पानावर प्रसिद्ध करणारे दै. ग्लोबल महातेज हे एकमेव दैनिक ठरले आहे. अनेक मान्यवरांनी त्याचे वाचन करून दै. महातेजचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.**



दै. ग्लोबल महातेजचे वाचन करताना माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील.



दै. ग्लोबल महातेजचे वाचन करताना माजी नगराध्यक्षा सौ. पुष्पलताताई पाटील.



दै. ग्लोबल महातेजचे वाचन करताना पोलिस उपअधीक्षक श्री. विनायक कोते.

# वाईटावर चांगल्याचा विजय म्हणजेच दसरा अर्थात विजयादशमी...!

## प्रतिकात्मक निर्जीव रावण दहनातून बोध घेणे गरजेचे...!!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा :**

**भरत पाटील**

दसरा सणाच्या माध्यमातून अर्थात विजयादशमीला आपण वाईटावर चांगल्याचा विजय झाल्याचा आनंद व्यक्त करतो. रामायणानंतर सुरू झालेल्या या सणातून आजही अनेक बोध घेण्याची गरज आहे. प्रभू श्रीरामचंद्रांनी रावणाचा वध केला याचाच अर्थ दुष्ट व राक्षस प्रवृत्तीला त्यांनी संपविले. रावणात अनेक सदगुण होते. तो प्रचंड ज्ञानी व महापराक्रमी होता. कमालीचा शिवभक्त होता. साक्षात देवाधिदेव महादेवांना त्याने प्रसन्न केलेले होते. राज्यशास्त्र व युद्धशास्त्रातही तो निपुण होता. त्याला दहा तोंडे होती. नऊच्या नऊ ग्रह त्याने उलटे करून त्याच्या सिंहासनाखाली ठेवले होते. यातून त्याचा माजही लक्षात येतो. सीता मातेचे हरण करून त्याने त्याच्या सर्व सदगुणांवर पाणी फेरले. परिणामी त्याला मरावे लागले. रावणाची पत्नी मंदोदरी व बंधू बिभिषण यांनी सीता मातेच्या अपहरण कुकृत्याचा कडाडून विरोध केला होता. सीता मातेला सन्मानाने प्रभू श्रीरामचंद्रांकडे परत पाठविण्यासाठी त्यांनी अनेकदा रावणाला सांगून पाहिले. मात्र, रावणाने ऐकले नाही. सवाष्णीचा तळतळा आणि शाप अत्यंत प्रभावी असतो. ज्याने - ज्याने आदिमाया आदिशक्तीचे रूप असलेल्या महिलांना अपमानीत केले, त्यांचे शीलहरण केले, त्यांचा विनाश निश्चित असतो. रावणाच्या बाबतीतही हेच झाले. शेवटी त्याला त्याच्या कुकर्माचे फळ भोगावे लागले.

याचाच अर्थ असा, की आपल्यात कितीही सदगुण असले, तरी एका दुर्गुणाने आपण कायमचे संपू शकतो. दुसरे असे, की चांगले सल्लागार जेव्हा आपणास चांगला सल्ला देतात तेव्हा आपण तो ऐकला नाही, तर आपला विनाश अटळ असतो. महाभारतातही भगवान श्रीकृष्णाच्या निमित्ताने पांडवांकडे चांगला सल्लागार होता. त्यामुळे पांडव नेहमी नीतीने वागले. परिणामी ते युद्धात विजयी झाले. खरेतर पांडवांपेक्षाही कौरवांची सेना मोठी होती. अनेक रथी, महारथी व अतिरथी त्यांच्या सेनेत होते. मात्र, त्यांचे सल्लागार शकुनी मामा होते. त्याच्या गैरसल्ल्याने आणि माता द्रौपदीचा दुर्योधनाने केलेल्या शीलहरणाने कौरवांचा नाश झाला.

### दसऱ्याचे महत्त्व

दरवर्षी दसरा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. हिंदू कॅलेंडरनुसार दसरा आश्विन किंवा कार्तिक महिन्याच्या दहाव्या दिवशी येतो. देशभरातील नागरिक त्यांच्या राज्यातील तथा भागातील प्रचलित शैलीत या उत्सवात सहभागी होतात. विजयादशमी हा हिंदू धर्मातील साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेला शुभ सण आहे. काही ठिकाणी लोक राम, लक्ष्मण, हनुमान यांच्या भव्य सार्वजनिक मिरवणुका काढतात. त्यात मोठ्या संख्येने सहभागी होतात, तर काही ठिकाणी भव्य प्रमाणात रामलीलाचे आयोजन केले जाते. बहुतांश शहरांमध्ये रावण दहनाचे आयोजन केलेच जाते. जेथे रावण दहनाचा कार्यक्रम होतो त्या जागेला जणू यात्रेचे स्वरूप प्राप्त होते. रावण दहनातून होणारी आतषबाजी पाहून खास करून बालके खूप खूश होतात. या आतषबाजीमुळेच ते पालकांना रावण दहनस्थळी नेण्याचा आग्रह करतात. काही ठिकाणी दसऱ्याच्या दिवशी घरोघरी फटाके फोडले जातात. काही ठिकाणी खानपान, खेळणी आदींचे मोठे स्टॉल लागतात. यात्रेसारखे मेळावे भरतात. देशभरात जेथे - जेथे सार्वजनिक नवरात्रोत्सव असतात तेथील सर्व प्रकारच्या देवी मातांना जवळच्या नद्यांमध्ये किंवा समुद्रात त्यांचे विसर्जन करतात. काही ठिकाणी भव्य स्वरूपात विसर्जनाच्याही मिरवणुका काढल्या जातात. दसऱ्यानंतर बाजारात खऱ्या अर्थाने चहल - पहल सुरू होते. सर्व प्रकारचे बाजार गजबजायला सुरूवात होते. लोकांना दसऱ्यापासूनच दिवाळीचेही वेध लागतात.



(छायाचित्र : नितेश बारी)

# श्री मंगळग्रह मंदिरात विजयादशमीनिमित्त शस्त्रपूजन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : विजयादशमी अर्थात दसरा सणानिमित्त येथील मंगळग्रह सेवा संस्था संचलित श्री मंगळग्रह मंदिरात अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी शस्त्रपूजन कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. यंदा गुरुवार, दि. २ ऑक्टोबर रोजी सकाळी हा कार्यक्रम पार पडला.

अमळनेर येथील पोलिस उपअधीक्षक विनायक कोते, पोलिस निरीक्षक दत्तात्रय निकम, पोलिस उपनिरीक्षक समाधान गायकवाड, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे श्री. लोटन फकिरा पाटील, श्री. विलास सुकदेव चौधरी, श्री. अनिल मधुकर महाजन, श्री. सुनील सोमा महाजन, श्री. दिनेश विश्वासराव ठाकरे हे शस्त्रपूजनाचे मानकरी होते. सुरूवातीला त्यांच्या शुभहस्ते विधिवत मंत्रोच्चारात संकल्प करण्यात आला. त्यानंतर गणपती पूजन, विश्वकर्मा स्मरण, तसेच प्रधान देवता मंगळग्रह देवाचे स्मरण करण्यात आले. त्यानंतर शस्त्रपूजन विधी पार पडला. मंदिराचे मुख्य पुरोहित शुभम वैष्णव यांनी पौरोहित्य केले.

याप्रसंगी मंगल सेवेकरी श्री. आर. टी. पाटील, श्री. प्रकाश मेखा, श्री. व्ही. व्ही. कुळकर्णी, श्री. पुषंद ढाके, मेजर राजेंद्र यादव यांच्यासह मंदिर परिसरातील उपस्थित भाविक व मंदिराचे सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शस्त्रपूजा का करतात?

पूर्वी राजे- महाराजांच्या काळात विजयादशमीच्या दिवशी शस्त्रपूजा केली जात असे. शस्त्रे धैर्य, शौर्य व संरक्षणाचे प्रतिक मानले जातात. शस्त्रपूजेच्या दिवशी पूर्वीच्या काळी राजे प्रगतीचे प्रतिक मानून राज्यांच्या सिमा ओलांडत कूच करत असत. यादिवशी केलेली पूजा विजय, धैर्य, यश आणि समृद्धी प्रदान करते, अशी मान्यता होती. ती आजही कायम आहे.

# खंडे नवमीला खंड्या पूजनासह शस्त्रपूजनाचे आयुर्वेदिक महत्त्व

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आयुर्वेद हे केवळ रोगोपचार पद्धती नसून धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चार पुरुषार्थांना साधणारे शास्त्र आहे. आयुर्वेद हे शरीर, मन, इंद्रिय व आत्मा यांच्या संतुलनाला महत्त्व देतो. शस्त्रपूजनाची परंपरा आयुर्वेदिकदृष्ट्याही खोल अर्थ सांगणारी आहे. आयुर्वेदिक दृष्टिकोनातून शस्त्रपूजन

**१) रक्षण (स्वस्थस्य स्वास्थ्य रक्षणम् )** : आरोग्य टिकविणे हे आयुर्वेदाचे पहिले उद्दिष्ट आहे. शस्त्र हे फक्त हल्ला करण्याचे साधन नसून रक्षणाचे प्रतीक आहे. त्याप्रमाणे आयुर्वेदाचे औषध, आहार व दिनचर्या ही शरीराचे रक्षण करणारी साधने आहेत. शस्त्रपूजन म्हणजे शरीररक्षणासाठी साधनांचे महत्त्व मान्य करणे आहे.

**२) शुद्धीकरण व निर्जंतुकीकरण (शौच आणि स्वच्छता)** : पूजनापूर्वी शस्त्र धुवून त्यास स्वच्छ करून, गंध, हळद, कुंकू लावले जाते. हळद, चंदन, धूप, औषधी वनस्पतींना प्रतिजैविक व वातशामक गुणधर्म आहेत. त्यामुळे शस्त्रांची शारीरिक स्वच्छता तसेच ऊर्जात्मक शुद्धी होते.

**३) सात्त्विकता व मानसिक संतुलन** : आयुर्वेद म्हणतो मन प्रसादः स्वास्थ्यस्य मूलम् (मन प्रसन्न असेल तर आरोग्य टिकते). शस्त्रपूजनात ध्यान, मंत्रोच्चार, आरती केल्याने सात्त्विक ऊर्जा वाढते व मन स्थिर होते. हे मानसिक बल (ओज वाढविणारे) आरोग्य टिकविण्यासाठी महत्त्वाचे आहे.

**४) बल आणि वीर्य संवर्धन** : शस्त्रपूजन हे बल व शौर्य यांचे प्रतीक आहे. आयुर्वेदात बल (शरीरशक्ती), वीर्य (स्फूर्ती), आणि ओज (जीवनरस) यांचा संबंध शौर्याशी जोडला जातो. शस्त्रपूजनाने मानसिक धैर्य वाढते. जे थेट बल व रोगप्रतिबंधक शक्ती वाढविते.

**५) कर्मयोग व साधनपूजन** : आयुर्वेदानुसार प्रत्येक कर्मासाठी वापरण्यात येणारे साधन पवित्र मानावे. शस्त्रपूजन म्हणजे कर्माच्या साधनांचा सन्मान होय. ज्याप्रमाणे वैद्य आपले औषधपात्र, ग्रंथ व शस्त्रक्रियेसाठी वापरणारी उपकरणे पूजतात. शेतकरी नांगर, कारागीर हातोडा व अवजारे वैद्य औषध व शस्त्रक्रियेची उपकरणे हे सर्व आयुर्वेदिक तत्त्वानुसार रक्षण व उपजीविकेचे साधन म्हणून पूजनीय ठरतात. आयुर्वेदिकदृष्ट्या सर्वात महत्वाचे शस्त्र म्हणजे रक्षणशक्ती. शरीरात रोगांशी लढणारी व्याधिक्षमत्व ही अंतर्गत शस्त्रे आहेत. पूजन म्हणजे संतुलनबाह्य शस्त्रपूजन व आंतरिक रोगप्रतिबंधक शक्ती होय. दोन्हींचा सन्मान करणे. हळद, चंदन, धूप यांचा उपयोग प्रतिजैविक, वात-पित्तशामक व मनःशुद्धी करणारा असतो.

# विजयादशमीनिमित्त अमळनेरला रावण दहन

अमळनेर : येथील पवनपुत्र क्रीडा मंडळातर्फे विजयादशमीनिमित्त रुबजी नगरातील खळेश्वर मंदिरासमोरील दसरा मैदानात गुरुवार, दि. २ ऑक्टोबर रोजी सायंकाळी रावण दहन झाले. भोईवाडा व माजी उपनगराध्यक्ष विनोद लांबोळे मित्रमंडळाने गेल्या वीस वर्षांपासून ही परंपरा कायम राखली आहे.

माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील अध्यक्षस्थानी होते. खानदेश शिक्षण मंडळाचे संचालक हरी भिका वाणी, डॉ. अनिल शिंदे, पोलिस उपअधीक्षक विनायक कोते, पोलिस निरीक्षक दत्तात्रय निकम, अर्बन बँकेचे चेअरमन भरतकुमार ललवाणी, शिवसेना तालुकाध्यक्ष सुरेश पाटील, शहराध्यक्ष संजय पाटील, माजी नगरसेवक विनोद कदम, नरेंद्र सदानशिव, काँग्रेसचे शहराध्यक्ष मनोज पाटील, राजेश पाटील, सलीम शेख चिरागोद्दीन, प्रताप शिंपी, राष्ट्रवादी युवकचे काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष भूषण भदाणे, डॉ. जयेश शिंदे, नरेंद्र चौधरी, महेंद्र महाजन, ॲड. सुरेश सोनवणे, योगेश महाजन, मुख्तार खाटीक, इमरान खाटीक, नावेद शेख, रामदास शेलकर, सोमा माळी, मधुकर सोनवणे, डॉ. विलास महाजन, भाईदास महाजन, पांडुरंग भोई, प्रवीण महाजन, सुनील महाजन आदी प्रमुख पाहुणे होते.

दरम्यान, दसरा मैदानस्थळी राम आणि लक्ष्मण यांची सजीव आरास साकारण्यात आली होती. आकर्षक सजावट केलेल्या रथातून प्रतिकात्मक राम-लक्ष्मण मैदानावर दाखल झाले. आमदार अनिलदादा पाटील यांच्या हस्ते श्रीराम व लक्ष्मण यांचे पूजन झाले. अनिलदादा पाटील यांचा आयोजकांकडून सत्कार करण्यात आला. यावेळी अनिलदादा यांनी आयोजक व उपस्थितांना दसऱ्याच्या शुभेच्छा दिल्या. त्यानंतर फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली होती. श्रीरामांच्या हस्ते बाण सोडून रावणाच्या भव्य प्रतिमेचे दहन करण्यात आले. यावेळी प्रभू श्रीरामचंद्रांचा जयघोष करण्यात आला. प्रा. दिनेश शेलकर यांनी सूत्रसंचालन केले.



# २४ हजार करोड के महल में गरबा खेलने वाली महारानी

सोशल मीडिया पर इन दिनों नवरात्रि के गरबा की तस्वीरें और वीडियो वायरल हो रहे हैं। खासकर वडोदरा के लक्ष्मी विलास पैलेस में हो रहे गरबा नाइट की। यहां दुनिया के सबसे बड़े निजी घर में रहने वाली महारानी राधिकाराजे गायकवाड़ का गरबा देखकर हर कोई प्रभावित हो गया है। फोर्ब्स ने उन्हें भारत की सबसे सुंदर महारानी कहा है। वे घाघरा-चोली पहनकर इतनी खूबसूरत लग रही थी कि सारे हक्का बक्का हो गये । यह पैलेस सोने की दीवारों वाला है और इसकी कीमत करीब २४ हजार करोड रुपये बताई जाती है। यहां पिछले तीन साल से मोतीबाग ग्राउंड में गरबा नाइट हो रही है। टिकट सिर्फ २७५ रुपये का है, तो आम लोग भी आकर गरबा खेल सकते हैं। लेकिन इस बार महारानी ही इवेंट की स्टार बन गई हैं। उन्होंने अलग-अलग रंगों के घाघरे पहने और गरबा करके सबको मंत्रमुग्ध कर दिया।

**अलग-अलग लुक्स में कमाल**

महारानी राधिकाराजे अपने देसी कपड़ों से हमेशा लोगों का दिल जीत लेती हैं। गरबा नाइट में भी उनके ब्राइट कलर के घाघरा-चोली वाले लुक्स को खूब पसंद किया जा रहा है। उनका स्टाइलिंग का अंदाज भी गजब का है। गरबा डांस देखा तो बाकी सब फीके लग गए।

आइए देखें उनके कुछ स्पेशल लुक्स:पहला लुकः कलरफुल ग्रे घाघरा

वे ग्रे बेस वाले कलरफुल लहंगे में दिखीं। इसमें जिगजैग लाइनें बनी थी और बॉर्डर गोल्डन थी। साथ में ब्लू-रेड एम्ब्रॉयडरी वाली चोली पहनी, जो फ्लोरल थ्रेड वर्क से सजी थी । डोरी वाली लटकन इसे और सुंदर बना रही थी। पर्पल दुपट्टा, जिसका बॉर्डर ग्रे था और आखिर में कलरफुल लटकन लगी थी । हाथों में चूड़ियां, गले में हार, बाल बन में बांधे और मैचिंग हेयर एक्सेसरी लगाई थी । लाल बिंदी ने लुक को रॉयल टच दिया था ।

**दूसरा लुकः पीला घाघरा**

पीले घाघरे में वे बेहद प्यारी लग रही थी । घाघरे पर अलग-अलग कलर की लाइनिंग थी । बॉर्डर पर्पल और व्हाइट लाइनों से हाइलाइट थी । मैचिंग दुपट्टा था , लेकिन बॉर्डर प्लेन रखा था । और धागों वाली लटकन से सजाया था। इसे पल्लू की तरह पिन-अप करके गरबा खेला था। चोली रंग-बिरंगी थी, स्लीव्स कोहनी तक थी , आगे सितारे चमक रहे थे । नेक सिंपल, पीछे कटआउट डिजाइन और लटकन घाघरे तक लटक रही थी । सिल्वर चोकर, पीली चूड़ियां, हार, हेयर एक्सेसरी और लाल बिंदी ने पूरा लुक परफेक्ट कर दिया था।

**तीसरा लुकः काला-नीला घाघरा**

काले घाघरे में नीला चौड़ा बॉर्डर थी , वह बिना ज्यादा कढ़ाई कि थी । दुपट्टा भी मैचिंग था , लेकिन कलर उल्टे - बॉर्डर ब्लैक और बाकी नीला था । बॉर्डर पर रंग-बिरंगी धागों वाली गेंद जैसी लटकन लगाई थी । चोली हैवी थी , सितारों और कलरफुल कढ़ाई से सजी थी । बालों में गजरा, हाथ में सिल्वर बाजूबंद जैसी चूड़ी थी , पर्ल्स वाली माला और मैचिंग इयररिंग्स पहनीं थी । यह लुक भी कमाल का था।

नवरात्रि २०२५ में यह गरबा २२ सितंबर से २ अक्टूबर तक चल रहा है। महारानी ने कहा है कि यह ट्रेडिशन को ग्लोबल ले जाने का प्लान है। सबको इनवाइट किया था । सबने आकर गरबा का बहुत मजा लिया। यह इवेंट हमेशा यादगार रहेगा।



हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे विजयादशमीनिमित्त पथसंचलन

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : दरवर्षाप्रमाणे विजयादशमीनिमित्त गुरुवारी सकाळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पथसंचलन झाले. मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या संघाच्या स्वयंसेवकांनी अमळनेरकरांचे लक्ष वेधले. पथसंचलनात स्वयंसेवकांमध्ये प्रचंड उत्साह होता.

म्हसकर प्लॉट परिसरातून पथसंचलनाला प्रारंभ झाला. नेताजी सुभाष चौक, तिरंगा चौक, बसस्थानक , महाराणा प्रताप चौक, स्टेशन रोड मार्गे पुन्हा म्हसकर प्लॉटवर पथसंचलनाची सांगता झाली. या संचलनात तीनशेहून अधिक स्वयंसेवक गणवेशात सहभागी झाले होते. मंगलवेशातही अनेक स्वयंसेवक उपस्थित होते. संचलनावेळी नागरिकांनी ठिकठिकाणी पुष्पवृष्टी व आतषबाजी केली. संचलनामुळे शहरात देशभक्तीचे वातावरण दिसून आले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे, अशी माहिती संघाचे जिल्हा प्रचारप्रमुख डॉ. चंद्रकांत पाटील यांनी दिली.



## लायन्स क्लबतर्फे उद्या तणाव व्यवस्थापन सेमिनार

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : इंटरनॅशनल सेवा सप्ताहांतर्गत येथील लायन्स क्लबतर्फे सुजान मंगल कार्यालयात मानसिक स्वास्थावर तणाव व्यवस्थापन सेमिनार होणार आहे. रविवार, दि. ५ ऑक्टोबर रोजी सकाळी नऊला हे सेमिनार होईल. धुळे येथील सुप्रसिद्ध मानसोपचारतज्ज्ञ डॉ. रोहन शाह प्रमुख वक्ते असतील. धावपळीच्या जीवनशैलीमुळे तणाव हा प्रत्येक वयोगटातील व्यक्तींचा मूक साथीदार बनला आहे. यामुळे चिंता, नैराश्य, मधुमेह, उच्च रक्तदाब आणि हृदयरोगासारख्या विकारांना खतपाणी मिळते. या सेमिनारमध्ये तणाव नियंत्रणासाठी वैज्ञानिक उपाय, व्यावहारिक मार्गदर्शन आणि सोपी तंत्रे शिकवली जाणार आहेत. हा उपक्रम विद्यार्थी, शिक्षक, पालक, व्यावसायिक, महिला मंडळ, डॉक्टर्स, ज्येष्ठ नागरिक अशा सर्वांसाठी उपयुक्त ठरणार आहे. शाळा-महाविद्यालये, कंपन्या व विविध संस्थांनी विद्यार्थी, कर्मचारी व सदस्यांना सहभागासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन अध्यक्ष डॉ. संदीप जोशी, सचिव महेंद्र पाटील, कोषाध्यक्ष नितीन विंचूरकर, प्रोजेक्ट चेअरमन चेतन जैन व सदस्यांनी केले आहे.

# जुनी पांढरी शाळा बनली कचरा डेपो


(छायाचित्र : रजनीकांत पाटील)

**नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर; पालिका प्रशासनाने लक्ष देण्याची गरज**

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : पैलाड भागातील जुनी पांढरी शाळा परिसरात मोठ्या ा प्रमाणात कचरा साचला आहे. जणू काही ही जागा म्हणजे कचरा डेपोच झाली आहे. परिणामी या घाणीमुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. पालिका प्रशासनाने याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

पैलाड भागातील जुन्या पांढरी शाळा परिसरात गेल्या दीड महिन्यापासून कचऱ्याचा प्रचंड ढीग साचला आहे. परिणामी दुर्गंधी पसरून डासांची उत्पत्तीही वाढली आहे. परिसरातील रहिवाशांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही पालिका प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष आहे. पावसाच्या पाण्याने कचरा विखुरला गेला आहे. डासांच्या प्रादुर्भावामुळे डेंग्यू, मलेरिया आदी रोगांचा धोका निर्माण झाला आहे. दररोज या ठिकाणी जाण्या-येण्यास आम्हाला त्रास होतो. शाळेजवळ असल्याने लहान मुलांच्या आरोग्यालाही धोका आहे. नगरपालिका प्रशासनाने त्वरित लक्ष देऊन हा कचरा हटवावा. परिसराची स्वच्छता करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

> “ या परिसराला सुमारे महिनाभरापासून कचरा डेपोचे स्वरूप आले आहे. दुर्गंधी व डासांमुळे आम्हाला नाहक त्रास सहन करावा लागत आहे. पालिका कर्मचाऱ्यां वारंवार सांगूनही याकडे त्यांचे दुर्लक्ष आहे.
>
> **– लोटन पाटील,** रहिवासी, पैलाड, अमळनेर

॥ ऋणनिर्देश ॥

सबसे ‘तेज’ ग्लोबल महातेज...!

ग्लोबल महातेज

घटस्थापनेपासून अमळनेरकरांच्या विविध विषयांना निर्भीड, निष्पक्ष व परखडपणे वाचा फोडण्याचा आम्ही प्रामाणिक प्रयत्न करीत आहोत. याबाबत वाचक, जाहिरातदार व हितचिंतकांकडून आम्हास भरभरून प्रतिसाद मिळत आहे. तसेच मनसोक्त अभिनंदनही केले जात आहे. आम्ही अमळनेरच्या वृत्तपत्रांच्या इतिहासात प्रथमच सहा पानी इंपोर्टेड पुरवणी प्रसिद्ध केली. तिलाही अल्पावधीत भरभरून प्रतिसाद मिळाला...! भविष्यातही असेच प्रेम , आशीर्वाद आपणाकडून लाभावेत, ही आग्रही विनंती.

दै. ग्लोबल महातेज टीम



आनंद डिगंबर महाले – संपादक
भरत पाटील – कार्यकारी संपादक
शरद कुलकर्णी – जाहिरात व्यवस्थापक
योगेश महाजन – उपसंपादक
समीर सांगळे – मुख्य आर्टिस्ट
रजनीकांत पाटील – मुख्य बातमीदार
उपेंद्र पाटील – आर्टिस्ट
संजीव बिऱ्हाडे – वितरण सहयोगी
संदीप पाटील – वितरण सहयोगी

# महात्मा गांधी जयंतीनिमित्त अमळनेरला काँग्रेसची बैठक

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



अमळनेर : आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे. पूर्ण तालुका काँग्रेसमय करण्यासाठी २१ ऑक्टोबरपासून कामतवाडी ते कपिलेश्वर चार दिवसांची पदयात्रा काढण्यात येईल. यात काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी रहावे, असे आवाहन संदीप घोरपडे यांनी केले.

महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री जयंतीनिमित्त येथील श्री स्वामी समर्थ केंद्राजवळील वीज कर्मचाऱ्यांच्या पतसंस्थेत गुरुवारी सकाळी बैठक झाली. याप्रसंगी ते कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बी. के. सूर्यवंशी, मनोज पाटील, शांताराम पाटील, त्र्यंबक पाटील, रामकृष्ण पाटील, प्रा. श्याम पवार, महिला तालुकाध्यक्षा सौ. सुलोचना वाघ, प्रवीण जैन, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेश पाटील, प्रदेश पदाधिकारी तुषार संदानशिव आदी उपस्थित होते. मनोज पाटील यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर टिका केली.

राजेंद्र पाटील, रवींद्र पाटील, शरद पाटील, ॲड. रज्जाक शेख, कन्हय्यालाल कापडे, एस. सी. तेले, रोहिदास कापडे, राजेंद्र चौधरी, दिलीप पाटील, पार्थ राज पाटील, बन्सीलालजी भागवत, राजू भाट, सईद तेली, एस. एस. शिंदे, भिकाजी पाटील, एस. पी. पाटील, आनंद धनगर, जब्बार मण्यार आदी उपस्थित होते. गजेंद्र साळुंखे यांनी आभार मानले.

## माजी आमदार बच्चू कडूंची अमळनेरला उद्या सभा

ग्लोबल महातेज वृत्तसेवा :



अमळनेर : प्रहार जनशक्ती पक्षाचे माजी आमदार बच्चू कडू यांची रविवार, दि. ५ ऑक्टोबरला येथे जाहीर सभा होणार आहे. इंदिरा भुवन येथे दुपारी दोनला ही सभा होईल. सभेत शेतकऱ्यांविरूद्ध होत असलेल्या अन्यायाबाबत आवाज उठविला जाणार आहे.

सभेसाठी जिल्ह्यातील सर्व शेतकरी, सर्व संघटना, विद्यार्थी आणि दिव्यांग बांधवांना आमंत्रण देण्यात आले आहे.

सभेसाठी अमळनेर तालुक्यातील महाविकास आघाडीचे घटक पक्ष असलेले राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, काँग्रेस व शिवसेना (उध्दव ठाकरे गट) यांचेही सहकार्य आहे. माजी आमदार डॉ. बी. एस. पाटील व महाविकास आघाडीचे नेते उपस्थित राहणार आहेत. शेतकरी कर्जमाफीवर भूमिका मांडण्यात येणार आहे. शेतकऱ्यांनी या सभेस मोठ्या संख्येने उपस्थिती द्यावी, असे आवाहन प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाध्यक्ष शिवराम पाटील, तालुकाध्यक्ष संतोष पाटील, संचालक प्रा. पवन पाटील, युवक अध्यक्ष रवी पाटील, दिव्यांग अध्यक्ष दिलीप कासार, प्रदीप बोरसे व दिनेश पाटील आदींनी केले आहे.



## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

ग्लोबल महातेज

आजच...! आपली जाहिरात बुक करा

दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास

‘ चमकण्याची ’ तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!!

डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

**जाहिरात दर**

| | |
|---|---|
| १) पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234

वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.




## देवीची योगनिद्रा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

नवरात्रोत्सवानंतर देवी पाच दिवस निद्रा घेते. त्यामुळे उपासना करू नये, असा मेसेज सध्या काही व्हॉट्सअॅप ग्रुपवर फिरत आहेत. त्यामुळे देवपूजा बंद ठेवावी का ? असा प्रश्न भाविकांना पडणे साहजिक आहे. मात्र याला कोणताही धर्मशास्त्रीय आधार नाही.

देव जरी निद्रा घेत असेल, तर ती योग निद्रा असते. त्यामुळे आपले दैनंदिन उपचार, पूजा, उपासना बंद न करता सुरूच ठेवली पाहिजे. देवशयनी एकादशीला विष्णू क्षीरसागरात निद्रा घेतात. चार महिने निद्रा घेतल्यावर कार्तिक शुद्ध एकादशीला ते जागे होतात. या चार महिन्यांत देवपूजा बंद असते का ? उलट या काळात सर्वजण व्रते, अनुष्ठाने करतात. असे जर नियम असते, तर चार महिने पंढरपूरला विठ्ठलाची पूजा बंद ठेवावी लागली असती. धर्म व अध्यात्म याविषयी अपुऱ्या ज्ञानाच्या आधारे प्रसारित केलेल्या माहितीबाबत नेहमी जाणकारांना विचारून घेणे योग्य असते.









अमळनेर : संभाजी भिडे गुरुजी प्रणीत शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान संचलित जय बजरंग मंडळ पानखिडकी यांच्यातर्फे धर्म जागृतीच्या उद्देशाने आयोजित 'श्री दुर्गा माता दौड'ला बुधवारी पहाटे पाचला पानखिडकीपासून प्रारंभ झाला. सराफ बाजार, दगडी दरवाजातील भवानी माता मंदिर, शनिपेठेतील गायत्री माता मंदिर, गजानन बाबा मंदिर, सिंधी कॅम्पमधील दुर्गा माता मंदिर, जय झुलेलाल मंदिर, श्री अंबऋषी महाराज टेकडी या मार्गाने गेली असता ठिकठिकाणी आरती झाली. यावेळी 'दौड 'चे ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले. त्यानंतर 'दौड ' पानखिडकीतील दुर्गामाता मंदिराजवळ परतली. (छायाचित्रे : नितेश बारी)

# विजयाची प्रेरणा देणारा उत्सव : दसरा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**सप्तशतीचे पाठ व हवन करण्याचा भारतीय संस्कृतीनुसार विधी असतो. सप्त म्हणजे सात. शत म्हणजे शंभर. स्त्रीलिंगी रूप–सप्तशती. सातशे श्लोकात्मक त्रिगुणात्मिका शक्तीचे महात्म्यवर्णन म्हणजेच दसरा अर्थात विजयपर्व होय. सत्याचा असत्यावर विजय. रज, तम आणि सत्त्व हे त्रिगुण एकत्रित येऊन असत्याचा नाश करतात. दसऱ्याला शस्त्रपूजन केले जाते. जे तमोगुणयुक्त महाकालीचे प्रतीक आहे. आपट्याच्या पानाचे सोने म्हणून आदान–प्रदान होते. जे महालक्ष्मीचे म्हणजे रजोगुणाचे प्रतीक आहे. दसऱ्याला सरस्वतीची पूजा केली जाते. जे महासरस्वतीचे सत्त्वगुणाचे प्रतीक आहे. अशा या त्रिगुणित असूनही त्रिगुणातीत असलेल्या आई आदिशक्तीचे सत्यस्वरूप जाणून घेण्याचा प्रयत्न करूया. विजया दशमी ( दसरा ), अश्वपूजा, शमीपूजन, सीमोल्लंघन हा दिवस साडेतीन मुहूर्तातील एक मानला जातो. मौल्यवान वस्तू खरेदीसाठी विजयादशमीचा दिवस शुभ मानला जातो. कोणत्याही शुभकामाचा प्रारंभ याच दिवशी करणे इष्ट मानले जाते.**

विजयादशमी अर्थात दसरा आश्विन शुद्ध दशमी म्हणजेच विजयादशमी (दसरा) हिंदूंचा एक प्रमुख सण. साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त असणाऱ्या दसरा (विजयादशमी) या सणाची अनेक वैशिष्ट्ये आहेत. दुर्गानवरात्र संपल्यानंतर लगेच हा दिवस येतो. त्यामुळे यास ' नवरात्रीच्या समाप्तीचा दिवस ' असेही मानतात. अगदी त्रेतायुगापासून हिंदू लोक विजयादशमी महोत्सव साजरा करत आलेले आहेत. विजयाची प्रेरणा देणारा आणि क्षात्रवृत्ती जागृत करणारा हा सण परस्परांतील प्रेम वृद्धींगत करायलाही शिकवितो. दसऱ्याला सीमोल्लंघन, शमीपूजन, अपराजितापूजन आणि शस्त्रपूजा ही चार कृत्ये करायची असतात. तसेच या दिवशी सरस्वती पूजनही केले जाते.

**१) उत्पत्ती आणि अर्थ :** दसरा शब्दाची एक उत्पत्ती दशहरा अशीही आहे. दश म्हणजे दहा आणि हरा म्हणजे हरल्या आहेत. दसऱ्याच्या आधीच्या नऊ दिवसांच्या नवरात्रात दाही दिशा देवीच्या शक्तीने भारलेल्या असतात. नियंत्रणात आलेल्या असतात, म्हणजेच दाही दिशांतील गण इत्यादींवर नियंत्रण आलेले असते. दाही दिशांवर विजय ही मिळालेला असतो.

**२) इतिहास :** प्रभू श्री रामचंद्रांचे पूर्वज राजा रघु या अयोध्याधिशाने विश्वजित यज्ञ केला होता. त्यांनी सर्व संपत्तीचे दान केले. नंतर ते एका पर्णकुटीत राहिले. एकदा कौत्स तिथे आले. त्यांना गुरुदक्षिणा म्हणून देण्यासाठी १४ कोटी सुवर्णमुद्रा हव्या होत्या. त्यामुळे राजा रघु कुबेरावर आक्रमण करावयास तयार झाले. कुबेराने आपटा आणि शमी या वृक्षांवर सुवर्णाचा वर्षाव केला. कौत्साने केवळ १४ कोटी सुवर्णमुद्रा घेतल्या. बाकीचे सुवर्ण प्रजाजनांनी नेले. त्या काळापासून म्हणजेच त्रेतायुगापासून हिंदू लोक विजयादशमी महोत्सव साजरा करीत आहेत. प्रभू श्रीरामांनी रावणावर विजय मिळवून त्याचा वध केला तोही याच दिवशी. या अभूतपूर्व विजयामुळे या दिवसाला ' विजयादशमी ' असे नाव मिळाले आहे.

पांडवांनी अज्ञातवास संपताच शक्तीपूजन करून शमीच्या वृक्षावरची आपली शस्त्रे काढली होती. (शमी वृक्षात ठेवलेले लोखंड कधीही गंजत नाही म्हणून पांडवांनी त्यांची शस्त्र शमी वृक्षात ठेवली होती.) पांडवांनी विराटाच्या गायी पळविणाऱ्या कौरवसैन्यावर स्वारी करून विजय मिळविला, तोही याच दिवशी. दसऱ्याच्या दिवशी इष्टमित्रांना आपट्याची पाने ' सोने ' म्हणून वाटण्याची प्रथा महाराष्ट्रात आहे. या प्रथेलाही ऐतिहासिक महत्त्व आहे. मराठे वीर मोहिमेवर गेल्यानंतर शत्रूचा प्रदेश लुटून सोन्यानाण्यांच्या रूपाने संपत्ती घरी आणत असत. असे हे विजयी वीर किंवा शिलेदार मोहिमेवरून परत आले, की दारात त्यांची पत्नी किंवा बहीण त्यांना ओवाळीत असे. ते परमुलखातून लुटून आणलेल्या त्या संपत्तीतला एखादा नग त्या ओवाळणी करणाऱ्या महिलेच्या तबकात टाकीत असत. घरात गेल्यावर आणलेली लूट देवापुढे ठेवीत. नंतर देवाला आणि वाडवडिलांना नमस्कार करून आशीर्वाद घेत असत. या घटनेची स्मृती सध्याच्या काळात आपट्याची पाने सोने म्हणून वाटण्याच्या रूपाने शिल्लक उरली आहे. हा सण एक कृषी विषयक लोकोत्सव म्हणूनही साजरा होत असे. पावसाळ्यात पेरलेले पहिले पीक घरात आल्यावर शेतकरी हा उत्सव साजरा करीत. नवरात्रात घटस्थापनेच्या दिवशी घटाखालच्या स्थंडिलावर नऊ धान्यांची पेरणी करतात आणि दसऱ्याच्या दिवशी त्या धान्यांचे वाढलेले अंकुर उपटून देवाला वाहतात. कित्येक ठिकाणी शेतातल्या भाताच्या लोंब्या तोडून आणून त्या प्रवेशद्वारावर तोरणासारख्या बांधतात. ही प्रथाही या सणाचे कृषीविषयक स्वरूपच व्यक्त करते. तसेच तो एक राजकीय स्वरूपाचा सणही ठरला.

## दसरा साजरा करण्याची पद्धत



**या दिवशी सीमोल्लंघन, शमीपूजन, अपराजितापूजन आणि शस्त्रपूजा ही चार कृत्ये करायची असतात.**

**सीमोल्लंघन :**
मध्यान्हकाली (तिसऱ्या प्रहरी, दुपारी) गावाच्या सीमेबाहेर ईशान्य दिशेकडे सीमोल्लंघनासाठी जातात. जिथे शमीचा किंवा आपट्याचा वृक्ष असेल तिथे थांबतात.

**शमी पूजन :**
**पुढील श्लोकांनी शमीची प्रार्थना करतात.**
**शमी शमयते पापं शमी लोहितकण्टका l**
**धारिण्यर्जुनबाणानां रामस्य प्रियवादिनी ll**
**करिष्यमाणयात्रायां यथाकाल सुखं मया l**
**तत्र निर्विघ्नकर्त्री त्वं भव श्रीरामपूजिते ll**

**अर्थ** : शमी पाप शमवते (नष्ट करते). शमीचे काटे तांबूस असतात. शमी प्रभू श्री रामचंद्रांना प्रिय असून अर्जुनाच्या बाणांना धारण करणारी आहे. हे शमी, प्रभू श्री रामचंद्रांनी तुझी पूजा केली आहे. मी यथाकाल विजययात्रेला निघणार आहे. ही यात्रा तू मला निर्विघ्न आणि सुखकारक कर.

**सरस्वती पूजन :**
या दिवशी सरस्वती पूजनही करतात.दसऱ्याला कार्यरत असलेल्या श्री सरस्वतीच्या मारक तत्वाच्या लहरींचा लाभ होऊन पूजकातील क्षात्रतेज जागृत होते.



**राजविधान :** दसरा हा विजयाचा सण असल्यामुळे या दिवशी राजेलोकांना विशेष विधान सांगितले आहे.
**लौकिक प्रथा :** काही घराण्यांतील नवरात्रींचे विसर्जन नवमीच्या दिवशी, तर काहींचे दशमीच्या दिवशी करतात.

**आपट्याचे पूजन :**
आपट्याची पूजा करताना पुढील मंत्र म्हणतात...
**अश्मन्तक महावृक्ष महादोषनिवारण l**
**इष्टानां दर्शनं देहि कुरु शत्रुविनाशनम् ll**
**अर्थ:** हे अश्मंतक महावृक्षा, तू महादोषांचे निवारण करणारा आहेस. तू मला माझ्या मित्रांचे दर्शन घडव आणि माझ्या शत्रूंचा नाश कर. नंतर त्या वृक्षाच्या मुळाशी तांदूळ, सुपारी आणि सुवर्णनाणे (विकल्पाने तांब्याचे नाणे) ठेवतात. मग वृक्षाला प्रदक्षिणा घालून त्याच्या बुंध्याजवळची थोडी माती आणि त्या वृक्षाची पाने घरी आणतात.
**आपट्याची पाने सोने म्हणून देणे :** शमीची नाही. पण आपट्याची पाने सोने म्हणून देवाला वाहतात आणि इष्टमित्रांना देतात. सोने हे लहानांनी मोठ्यांना द्यायचे असते, असा संकेत आहे. आपट्याची पाने तेजतत्त्वाच्या लहरींनी युक्त असतात. आपट्याची पाने स्वीकारणाऱ्याला दसऱ्याच्या दिवशी जास्त प्रमाणात कार्यरत असलेले प्रभू श्रीरामतत्त्व आणि श्री मारुतीतत्त्व यांचा सहज लाभ होतो. दसऱ्याला प्रभू श्रीरामचंद्र आणि श्री हनुमान यांचे स्मरण केल्याने जीवनात दास्यभक्ती निर्माण होऊन प्रभू श्रीरामचंद्रांचे तारक, म्हणजेच आशीर्वादरूपी तत्त्व मिळण्यास सहाय्य होते, अशी मान्यता आहे.

**अपराजितापूजन :**
ज्या ठिकाणी शमीची पूजा होते त्याच ठिकाणी भूमीवर अष्टदल काढून त्यावर अपराजितेची मूर्ती ठेवतात. तिची पूजा करून पुढील मंत्राने प्रार्थना करतात.



**हारेण तु विचित्रेण**
**भास्वत्कनकमेखला l**
**अपराजिता भद्ररता करोतु**
**विजयं मम ll**
**अर्थ :** गळ्यामध्ये चित्रविचित्र हार घालणारी, जिच्या कटीत चकाकणारी सुवर्णमेखला आहे, अशी आणि (भक्तांचे) कल्याण करण्याच्या कामी तत्पर अशी अपराजितादेवी मला विजय देवो. काही ठिकाणी अपराजितेची पूजा सीमोल्लंघनाला निघण्याच्या पूर्वीही करतात.
**शस्त्रे आणि उपकरणे यांचे पूजन :** या दिवशी राजे, सामंत आणि सरदार हे वीर आपापली उपकरणे आणि शस्त्रांचे पूजन करतात. त्याचप्रमाणे शेतकरी आणि कारागीर हे आपापली आऊते आणि हत्यारे यांची पूजा करतात.(काही लोक ही शस्त्रपूजा नवमीच्या दिवशीही करतात.)लेखणी आणि पुस्तके ही विद्यार्थ्यांची शस्त्रेच होत. विद्यार्थी त्यांचे पूजन करतात. या पूजनामागील उद्देश हा, की त्या- त्या गोष्टींमध्ये ईश्वराचे रूप पाहणे. अर्थात ईश्वराशी एकरूपता साधण्याचा प्रयत्न करणे.

## लेट पण थेट...!

**विजयादशमी अर्थात दसऱ्याच्या दिवशी प्रसिद्ध झालेल्या दसरा विशेषांक पुरवणीत वाचकांना प्रेरणा देणारा व ज्ञानवृद्धी करणारा मजकूर जाहिरातदारांनी आम्हास दिलेल्या भरभरून प्रतिसादामुळे प्रसिद्ध करता आला नाही. दसऱ्याचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याने एकदिवस उशिरा का होईना सदर माहिती आम्ही प्रसिद्ध करीत आहोत.**

## आपटा कसा ओळखावा ? पानांचे महत्त्व व उपयोग

**आपट्याची पाने खरखरीत असतात. मुलायम नसतात. आपट्याचे पान ३ इंचांपेक्षा लांब नसते. दसऱ्याला आपट्याचाी पाने खरेदी करताना नीट पाहून घ्यावीत. आपट्याच्या झाडाच्या फांद्या तोडण्याऐवजी फक्त गरजेपुरती पाने तोडावीत. फांद्या तोडल्यामुळे झाडाचा नाश होतो. हळूहळू हा बहुगुणी आपटा नाहीसा होऊ लागला आहे. शक्य असल्यास आपल्या कुंडीत आपट्याचे झाड लावून वर्षभर वाढवावे व त्याचीच पाने तोडून द्यावीत.**

## आपट्याच्या पानांचे महत्त्व काय ?



फार वर्षांपूर्वी वरतंतू नावाचे ऋषी होऊन गेले. त्यांच्याकडे विद्याभ्यासासाठी खूप विद्यार्थी येत. ते अभ्यास करून मोठे होत. त्यावेळी मानधन किंवा फी नव्हती. त्यामुळे शिक्षण संपल्यावर विद्यार्थी गुरुदक्षिणा देत. या ऋषींकडे ' कौत्स ' नावाचा एक शिष्य होता. त्याचे शिक्षण पूर्ण झाल्यावर गुरूंनी त्याला घरी जाण्यास परवानगी दिली. त्याने ऋषींना विचारले, की मी तुम्हाला काय गुरुदक्षिणा देऊ ? तुम्ही मागाल ते मी देईन. ऋषींनी कौत्साची परीक्षा घ्यावयाचे ठरविले. त्यांनी कौत्साला प्रत्येक विद्येबद्दल एक कोटी सुवर्णमुद्रा याप्रमाणे १४ विद्यांबद्दल १४ कोटी सुवर्णमुद्रा आणावयास सांगितल्या. कौत्स हे ऐकून गांगरून गेला. तो रघुराजाकडे गेला. परंतु राजाने त्याचवेळी विश्वजित यज्ञ केल्यामुळे खजिना संपला होता. मात्र तरीही राजाने कौत्साकडे तीन दिवसांची मुदत मागितली. राजाने इंद्रावर स्वारी करण्याचे निश्चित केले. इंद्राला रघुराजाचा पराक्रम माहीत होता. त्याने कुबेराला सारी हकीकत सांगितली. इंद्राने आपट्याच्या पानांची, सोन्याची नाणी बनवून, ती पावसासारखी राजाच्या राजवाड्यात पाडली. कौत्स त्या सुवर्णमुद्रा घेऊन वरतंतू ऋषींकडे गेला व गुरुदक्षिणा घेण्यास विनंती केली. परंतु ऋषींनी आनंदाने ते घेण्यास नकार दिला. ते सोने परत घेण्यास राजाने नकार दिल्यामुळे कौत्साने त्या मुद्रा आपट्याच्या झाडाखाली ठेवून, लोकांना लुटायला सांगितल्या. लोकांनी त्या वृक्षाची पूजा केली व पाहिजे तेवढ्या मुद्रा लुटल्या. तो दिवस दसऱ्याचा होता. म्हणून त्या दिवसापासून त्या झाडाची पूजा करून सोन्याची पाने लुटण्याची प्रथा सुरू झाली.

### आपटा पाने : औषधी उपयोग

१ ) पडजीभ वाढल्यामुळे येणाऱ्या खोकल्यात रोज दोन पाने गरम पाण्यात टाकून गार झाले, की थोडेथोडे पाणी प्यावे. पान तोंडात तासभर धरून ठेवावे
२) पायदुखी, गुडघेदुखी, खांद्येदुःखी, कंबरदुखी, मानदुखी : दुखणाऱ्याला भागाला आपट्याचे पान ओले करून उलगडून रात्री झोपताना सेलोटेपने लावून ठेवणे. सकाळी काढून टाकणे.
३) घसादुखीत आपट्याची पाने घशाला बांधून ठेवल्यास दुसऱ्या दिवशी बराच फरक जाणवतो.
४) ताप गेल्यावर येणाऱ्या अशक्तपणामध्ये रोज आपट्याची दोन पाने गरम पाण्यात टाकावीत. पाणी गार झाले की ते थोडे-थोडे प्यावे.
५) लठ्ठपणा, व्हेरीकोज व्हेन्स, व्हर्टीगो फुफ्फुसात पाणी होणे, हृदयामधे टोचणे, हृदय अकुंचन पावणे, हृदयामधे दुखणे, हृदयाचा व्हॉल्व खराब. याा त्रासावर सुद्धा आपट्याच्या पानांचे पाणी उपयोगी पडते असे जाणकारांचे म्हणणे आहे.

